ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, २० नोव्हेंबर, १९६३ | अंक २०

## विविध माहिती

**चीनच्या लष्करी सामर्थ्यांत घट**—गेल्या पांच वर्षांच्या कालांत चीनच्या लष्करी सामर्थ्यांत हळुहळू घट झाल्याचा अंदाज करण्यांत आला आहे. चीनमध्यें लष्कराची संख्या सुमारें २४ लाख होती. गेल्या कांहीं वर्षांत लष्करांतील सैनिकांत वाढ झालेली असण्याचाहि संभव आहे. परंतु लष्कराला लागणाऱ्या शस्त्रास्त्रांचा मात्र पुरेसा पुरवठा नाहीं. त्यामुळें त्याची कार्यक्षमता उतरत गेली आहे. शिवाय असलेलीं शस्त्रास्त्रेंहि आतां जुनींपुराणीं झालेलीं आहेत. चीनला रशिआकडून १९६० सालीं आधुनिक शस्त्रास्त्रांचा शेवटचा हप्ता मिळालेला आहे.

**भारत-झेकोस्लोव्हाकिआ व्यापारी करार**—भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान ५ वर्षें मुदतीचा व्यापारी करार करण्यांत आला आहे. त्याशिवाय ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमास मदत म्हणून झेकोस्लोव्हाकिआनें ५ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचीहि तयारी दाखविली आहे. झेकोस्लोव्हाकिआ आणि भारत ह्यांच्या दरम्यान सध्यां दरसाल १२·५ कोटी रुपयांची देवघेव उभयपक्षीं होते. येत्या तीन वर्षांत ही व्यापारी देवघेव दुप्पट करण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. कराराप्रमाणें १९६४ सालीं उभयपक्षीं १९·५ कोटी रुपयांची, १९६५ सालीं २३·५ कोटी रुपयांची आणि १९६६ सालीं २४·५ कोटी रुपयांची देवघेव करण्यांत यावयाची आहे.

**पोलाद कारखाना काढण्याची मागणी**—मध्यप्रदेशांतील बस्तार जिल्ह्याचे मुख्य ठिकाण जगदाळपूर, ह्या ठिकाणीं सार्वजनिक मालकीच्या विभागांत एक पोलादाचा कारखाना काढण्याची मागणी मध्यप्रदेशाच्या मुख्य मंत्र्यांनीं मध्यवर्ती सरकारकडे केली आहे. बस्तार जिल्ह्यांत लोखंडाच्या खनिजाचा खूप मोठा सांठा आहे. जपानी भूस्तर-शास्त्रज्ञांनीं संबंधित भागाची पहाणी केलेली आहे. त्यांच्या मतें हा सांठा २४० कोटी टनाएवढा प्रचंड आहे. पोलाद कारखान्यासाठी लागणारी वीज, पाणी व चुनखडी, ह्या गोष्टीहि उपलब्ध आहेत.

**कापडाच्या निर्यातींत घट**—परदेशी चलन मिळविण्यासाठी कापडाची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न सरकारकडून होत असले, तरी भारताच्या नेहमींच्या परदेशीय बाजारपेठांतून कापडाच्या निर्यातीची घट होत चाललेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दरसाल ७७·७ कोटी मीटर कापड निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. पण १९६२ सालीं फक्त ५२·९ कोटी मीटर कापड निर्यात करण्यांत आलें. १९६१ च्या निर्यातीपेक्षा ही निर्यात ८·९ टक्क्यांनीं कमी आहे.

**हॉलंडकडून मदत**— भारत मदत मंडळातर्फें देण्यांत यावयाच्या मदतीपैकीं आपली अंशतः मदत म्हणून हॉलंडच्या नॅशनल इन्व्हेस्टमेंट बँकेनें ६·५ कोटी गिल्डर्स अथवा ८·४५ कोटी रुपये मदत देण्याचें ठरविलें आहे. ही मदत जागतिक बँकेमार्फत देण्यांत येणार असून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणारें साहित्य आणि सल्ला मिळविण्यासाठी तिचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**रशिअन सोन्याची विक्री**—रशिआनें लंडनच्या बाजारांत आपलें सोनें विक्रीला पाठविण्यास प्रारंभ केला आहे. अलीकडेच रशिआचें सोनें घेऊन दोन जेट विमानें लंडनच्या विमानतळावर उतरलीं. एकाच आठवड्यांत रशिआनें दोनदा सोनें पाठविलें. ह्या सोन्याची किंमत सुमारें ६० लाख पौंड आहे. रशिआंतील अवर्षणामुळें तेथील गव्हाचें पीक मोठ्या प्रमाणांत बुडालें आहे. म्हणून रशिआ, अमेरिका व कॅनडा ह्यांच्याकडून गहूं विकत घेण्याचा विचार करीत आहे. गव्हाची किंमत देण्यासाठी सोन्याचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**नवा सहकारी साखर कारखाना**—नगर जिल्ह्यांतील कोपरगांव येथें स्थापन करण्यांत आलेल्या आणखी एका सहकारी साखर कारखान्यानें आपल्या पहिल्या गळितास प्रारंभ केला आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री हिंदमध्यें बनविण्यांत आली आहे. यंत्रसामग्रीसाठी १॥ कोटी रुपये लागले. महाराष्ट्रांतील हा सहावा सहकारी साखर कारखाना आहे. यंत्रसामग्रीच्या साह्यानें कारखान्यांत दररोज १,००० टन उसाचें गळित उरकण्यांत येईल. साखर उत्पादनाच्या चालू हंगामांत कारखाना १·४५ लाख साखरेचीं पोतीं निर्माण करूं शकेल असा अंदाज आहे.

**कीनिआंतील कापडाची बाजारपेठ**— कीनिआंतील बाजारपेठेंत खपणाऱ्या कापडापैकीं सर्वांत अधिक कापड जपानकडून आयात करण्यात येतें. जपान कीनिआला दरसाल २० लाख पौंड किंमतीचें कापड निर्यात करतो. जपानच्या खालोखाल भारताकडून कापडाचा पुरवठा होतो. सुमारें १६ लाख पौंड किंमतीचें कापड कीनिआ भारताकडून दरसाल घेतो. अलीकडे मात्र रशिआच्या गटांतील देश कीनिआला अधिक प्रमाणांत कापड पाठवूं लागले आहेत. कम्युनिस्ट देशांकडून पुरविण्यांत येणारें कापड किंमतीच्या व दर्जाच्या दृष्टीनेंहि जपानच्या अगर भारताच्या कापडापेक्षा चांगलें असतें. त्यामुळें जपानच्या व भारताच्या कीनिआमधील बाजारपेठेला धोका उत्पन्न झाला आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, २० नोव्हेंबर, १९६३ | अंक २०

## विविध माहिती

**चीनच्या लष्करी सामर्थ्यांत घट**—गेल्या पांच वर्षांच्या कालांत चीनच्या लष्करी सामर्थ्यांत हळुहळू घट झाल्याचा अंदाज करण्यांत आला आहे. चीनमध्यें लष्कराची संख्या सुमारें २४ लाख होती. गेल्या कांहीं वर्षांत लष्करांतील सैनिकांत वाढ झालेली असण्याचाहि संभव आहे. परंतु लष्कराला लागणाऱ्या शस्त्रास्त्रांचा मात्र पुरेसा पुरवठा नाहीं. त्यामुळें त्याची कार्यक्षमता उतरत गेली आहे. शिवाय असलेलीं शस्त्रास्त्रेंहि आतां जुनींपुराणीं झालेलीं आहेत. चीनला रशिआकडून १९६० सालीं आधुनिक शस्त्रास्त्रांचा शेवटचा हप्ता मिळालेला आहे.

**भारत–झेकोस्लोव्हाकिआ व्यापारी करार**—भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान ५ वर्षें मुदतीचा व्यापारी करार करण्यांत आला आहे. त्याशिवाय ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमास मदत म्हणून झेकोस्लोव्हाकिआनें ५ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचीहि तयारी दाखविली आहे. झेकोस्लोव्हाकिआ आणि भारत ह्यांच्या दरम्यान सध्यां दरसाल १२·५ कोटी रुपयांची देवघेव उभयपक्षीं होते. येत्या तीन वर्षांत ही व्यापारी देवघेव दुप्पट करण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. कराराप्रमाणें १९६४ सालीं उभयपक्षीं १९·५ कोटी रुपयांची, १९६५ सालीं २३·५ कोटी रुपयांची आणि १९६६ सालीं २४·५ कोटी रुपयांची देवघेव करण्यांत यावयाची आहे.

**पोलाद कारखाना काढण्याची मागणी**—मध्यप्रदेशांतील बस्तार जिल्ह्याचे मुख्य ठिकाण जगदाळपूर, ह्या ठिकाणीं सार्वजनिक मालकीच्या विभागांत एक पोलादाचा कारखाना काढण्याची मागणी मध्यप्रदेशाच्या मुख्य मंत्र्यांनीं मध्यवर्ती सरकारकडे केली आहे. बस्तार जिल्ह्यांत लोखंडाच्या खनिजाचा खूप मोठा सांठा आहे. जपानी भूस्तर-शास्त्रज्ञांनीं संबंधित भागाची पहाणी केलेली आहे. त्यांच्या मतें हा सांठा २४० कोटी टनाएवढा प्रचंड आहे. पोलाद कारखान्यासाठी लागणारी वीज, पाणी व चुनखडी, ह्या गोष्टीहि उपलब्ध आहेत.

**कापडाच्या निर्यातींत घट**—परदेशी चलन मिळविण्यासाठी कापडाची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न सरकारकडून होत असले, तरी भारताच्या नेहमींच्या परदेशीय बाजारपेठांतून कापडाच्या निर्यातीची घट होत चाललेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दरसाल ७७·७ कोटी मीटर कापड निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. पण १९६२ सालीं फक्त ५२·९ कोटी मीटर कापड निर्यात करण्यांत आलें. १९६१ च्या निर्यातीपेक्षा ही निर्यात ८·९ टक्क्यांनीं कमी आहे.


**हॉलंडकडून मदत**— भारत मदत मंडळातर्फें देण्यांत यावयाच्या मदतीपैकी आपली अंशतः मदत म्हणून हॉलंडच्या नॅशनल इन्व्हेस्टमेंट बँकेनें ६·५ कोटी गिल्डर्स अथवा ८·४५ कोटी रुपये मदत देण्याचें ठरविलें आहे. ही मदत जागतिक बँकेमार्फत देण्यांत येणार असून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणारें साहित्य आणि सल्ला मिळविण्यासाठी तिचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**रशिअन सोन्याची विक्री**—रशिआनें लंडनच्या बाजारांत आपलें सोनें विक्रीला पाठविण्यास प्रारंभ केला आहे. अलीकडेच रशिआचें सोनें घेऊन दोन जेट विमानें लंडनच्या विमानतळावर उतरलीं. एकाच आठवड्यांत रशिआनें दोनदा सोनें पाठविलें: ह्या सोन्याची किंमत सुमारें ६० लाख पौंड आहे. रशिआंतील अवर्षणामुळें तेथील गव्हाचें पीक मोठ्या प्रमाणांत बुडालें आहे. म्हणून रशिआ, अमेरिका व कॅनडा ह्यांच्याकडून गहूं विकत घेण्याचा विचार करीत आहे. गव्हाची किंमत देण्यासाठी सोन्याचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**नवा सहकारी साखर कारखाना**—नगर जिल्ह्यांतील कोपरगांव येथें स्थापन करण्यांत आलेल्या आणखी एका सहकारी साखर कारखान्यानें आपल्या पहिल्या गाळितास प्रारंभ केला आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री हिंदमध्यें बनविण्यांत आली आहे. यंत्रसामग्रीसाठी १॥ कोटी रुपये लागले. महाराष्ट्रांतील हा सहावा सहकारी साखर कारखाना आहे. यंत्रसामग्रीच्या साह्यानें कारखान्यांत दररोज १,००० टन उसाचें गाळित उरकण्यांत येईल. साखर उत्पादनाच्या चालू हंगामांत कारखाना १·४५ लाख साखरेचीं पोतीं निर्माण करूं शकेल असा अंदाज आहे.

**कीनिआंतील कापडाची बाजारपेठ**— कीनिआंतील बाजारपेठेंत खपणाऱ्या कापडापैकी सर्वांत अधिक कापड जपानकडून आयात करण्यात येतें. जपान कीनिआला दरसाल २० लाख पौंड किंमतीचें कापड निर्यात करतो. जपानच्या खालोखाल भारताकडून कापडाचा पुरवठा होतो. सुमारें १६ लाख पौंड किंमतीचें कापड कीनिआ भारताकडून दरसाल घेतो. अलीकडे मात्र रशिआच्या गटांतील देश कीनिआला अधिक प्रमाणांत कापड पाठवूं लागले आहेत. कम्युनिस्ट देशांकडून पुरविण्यांत येणारें कापड किंमतीच्या व दर्जाच्या दृष्टीनेंहि जपानच्या अगर भारताच्या कापडापेक्षा चांगलें असतें. त्यामुळें जपानच्या व भारताच्या कीनिआमधील बाजारपेठेला धोका उत्पन्न झाला आहे.

## भारतविख्यात स्टार कंपनीचे संस्थापक, मालक आणि चालक
## श्री. नारायणसिंह भवानसिंह राठोर राजपूत




श्री. नारायणसिंह राजपूत यांचा जन्म बेळगांव येथें १९०६ सालीं झाला. माता-पित्यांचें छत्र बाळपणांतच नाहींसें झाल्यानें नारायण-सिंहाच्या शालेय शिक्षणाची आबाळ झाली. घरचा धंदा तंबाखूचा असल्यानें नारायणसिंह त्यांत बालपणांतच प्रवीण झाले. शास्त्रीय चमत्काराकडे प्रथमपासूनच त्यांचा ओढा असल्यानें विशी ओलांडण्यापूर्वीच त्यांनीं 'जादूगार' म्हणून नांव मिळविलें होतें व बराच मोठा संच जमवला होता. पण या व्यवसायांत त्यांचें मन रमलें नाहीं म्हणून त्यांनीं १९२६ सालीं स्टार कंपनीची स्थापना केली. या दुकानांत ते औषधी आणि सुगंधी साहित्य तयार करीत व जोडीस देशी-परदेशी औषधें व साबण व इतर सुगंधी माल यांची विक्री करीत. प्रथम त्यांनीं आपले स्टार कंपनीमार्फत 'चमन' टूथपावडर्स, निलगिरी अर्क, पेनबाम, हेअर ऑईल्स् इत्यादि मालांची निर्मिति चालू केली. पुढें ते अलोपॅथिक पद्धतीचीं औषधें तयार करूं लागले व त्यांना बाहेरगांवच्या ऑर्डर्स मिळूं लागल्या. मालाची उठावदारपणें जाहिरात करण्याचें कसब नारायणसिंहाचेकडे आहे; त्यामुळें धंद्याची वाढ एकसारखी होत गेली.

युद्धकालांत शिथिल झालेला धंदा त्यांनीं १९४५ मध्यें पुनः जोरांत सुरू केला. त्यांनीं मोठ्या धडाडीनें स्वतःची लॅबोरेटरी आपल्या मालकीच्या कपलेश्वर येथील वास्तूमध्यें स्थापन केली. शास्त्रीय पदवीधर नेमून औषधांचा गुण व दर्जा वाढविला. त्यामुळें त्यांच्या कंपनीच्या मालास चांगलीच मागणी असते. कंपनीचा व्यापहि वाढला आहे. इराण, केटा, अरबस्तान येथील व्यापारी स्टार कंपनीच्या मालाची आर्जवून मागणी करतात. यावरून नारायणसिंहांची कर्तबगारी समजूं शकेल. भारतभर यांच्या कंपनीचे एजंटस पसरलेले असून लाखों रुपयांच्या मालाच्या ऑर्डर्स ते मिळवीत असतात. विशेष नवल म्हणजे, जीं ठिकाणें अत्तरासाठी व सुगंधी मालासाठी प्रसिद्ध आहेत, तेथेंसुद्धां स्टार कंपनीचीं अत्तरें व सुगंधी माल जाऊं लागला आहे. आज त्यांच्या कारखान्यांत ५० हून अधिक माणसें आहेत.

नारायणसिंह मोठे कल्पक गृहस्थ आहेत. त्यांना प्रत्येक गोष्टींत थोडीफार गति आहे. त्यांच्या कारखान्याच्या तिमजली इमारतीचा प्लॅन त्यांनीं स्वतः तयार केलेला आहे, येवढें सांगितल्यास पुरे. नवनवीन अत्तरें त्यांनीं शोधून काढलीं आहेत. व्यासंगानें त्यांनीं तयार केलेले औषधांचे फार्म्युले सरकारमान्य झाले आहेत. नारायणसिंह चिकित्सक दृष्टीचें असूनहि सौंदर्य-वादी कसे आहेत याची प्रतीति त्यांच्या बेळगांव येथील किल्ल्यां-तील 'कैलास' बंगल्याचे आवारांतील पहिलें बक्षीस मिळविलेली बागच देते.

नारायणसिंह ज्यांत हात घालतील त्यांत ते पहिल्या नंबरनेंच आजवर आलेले आहेत. नारायणसिंहांनीं राष्ट्रीय चळवळींतहि हिरीरीनें भाग घेऊन मान्यवर नेत्यांना साहाय्य केलें आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.




बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
कुंभारवाड, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.

काटकसरी जनांस आवाहन
आजच्या बचतीवर आपल्या
भविष्यकालीन योजना उभारा!
दि बेळगांव बँक लिमिटेड मध्यें
वक्तशीर संचय करा.
शेडयूल्ड बँक : स्थापना : १९३०
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव,
म्हैसूर राज्य.
सर्व कार्यक्षेत्रांतील लोकांना सोईच्या विविध बचत योजना.
: महाराष्ट्रांतील शाखा :
जयसिंगपूर, गडहिंग्लज, मिरज, बार्शी, माधवनगर, सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण, शिरोडें, चिपळूण, कणकवली, देवगड.
◆ म्हैसूर राज्यांत महत्त्वाच्या गांवीं व व्यापारी केंद्रांत शाखा.
एकूण ठेवी दोन कोटी, पंधरा लक्ष रुपयांवर
ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

भारतविख्यात स्टार कंपनीचे संस्थापक,
मालक आणि चालक

## श्री. नारायणसिंह भवानसिंह राठोर राजपूत



श्री. नारायणसिंह राजपूत यांचा जन्म बेळगांव येथें १९०६ सालीं झाला. माता-पित्यांचें छत्र बाळपणांतच नाहींसें झाल्यानें नारायण-सिंहाच्या शालेय शिक्षणाची आबाळ झाली. घरचा धंदा तंबाखूचा असल्यानें नारायणसिंह त्यांत बालपणांतच प्रवीण झाले. शास्त्रीय चमत्काराकडे प्रथमपासूनच त्यांचा ओढा असल्यानें विशी ओलांडण्यापूर्वीच त्यांनीं 'जादूगार' म्हणून नांव मिळविलें होतें व बराच मोठा संच जमवला होता. पण या व्यवसायांत त्यांचें मन रमलें नाहीं म्हणून त्यांनीं १९२६ सालीं स्टार कंपनीची स्थापना केली. या दुकानांत ते औषधी आणि सुगंधी साहित्य तयार करीत व जोडीस देशी-परदेशी औषधें व साबण व इतर सुगंधी माल यांची विक्री करीत. प्रथम त्यांनीं आपले स्टार कंपनीमार्फत 'चमन' टूथपावडर्स, निलगिरी अर्क, पेनबाम, हेअर ऑईलस् इत्यादि मालांची निर्मिति चालू केली. पुढें ते अलोपॅथिक पद्धतीचीं औषधें तयार करूं लागले व त्यांना बाहेरगांवच्या ऑर्डर्स मिळूं लागल्या. मालाची उठावदारपणें जाहिरात करण्याचें कसब नारायणसिंहाचेकडे आहे; त्यामुळें धंद्याची वाढ एकसारखी होत गेली.

युद्धकालांत शिथिल झालेला धंदा त्यांनीं १९४५ मध्यें पुनः जोरांत सुरू केला. त्यांनीं मोठ्या धडाडीनें स्वतःची लॅबोरेटरी आपल्या मालकीच्या कपलेश्वर येथील वास्तूमध्यें स्थापन केली. शास्त्रीय पदवीधर नेमून औषधांचा गुण व दर्जा वाढविला. त्यामुळें त्यांच्या कंपनीच्या मालास चांगलीच मागणी असते. कंपनीचा व्यापहि वाढला आहे. इराण, केटा, अरबस्तान येथील व्यापारी स्टार कंपनीच्या मालाची आर्जवून मागणी करतात. यावरून नारायणसिंहांची कर्तबगारी समजूं शकेल. भारतभर यांच्या कंपनीचे एजंटस पसरलेले असून लाखों रुपयांच्या मालाच्या ऑर्डर्स ते मिळवीत असतात. विशेष नवल म्हणजे, जीं ठिकाणें अत्तरासाठी व सुगंधी मालासाठी प्रसिद्ध आहेत, तेथेंसुद्धां स्टार कंपनीचीं अत्तरें व सुगंधी माल जाऊं लागला आहे. आज त्यांच्या कारखान्यांत ५० हून अधिक माणसें आहेत.

नारायणसिंह मोठे कल्पक गृहस्थ आहेत. त्यांना प्रत्येक गोष्टींत थोडीफार गति आहे. त्यांच्या कारखान्याच्या तिमजली इमारतीचा प्लॅन त्यांनीं स्वतः तयार केलेला आहे, येवढें सांगितल्यास पुरे. नवनवीन अत्तरें त्यांनीं शोधून काढलीं आहेत. व्यासंगानें त्यांनीं तयार केलेले औषधांचे फार्म्युले सरकारमान्य झाले आहेत. नारायणसिंह चिकित्सक दृष्टीचे असूनहि सौंदर्यवादी कसे आहेत याची प्रतीति त्यांच्या बेळगांव येथील किल्ल्यांतील 'कैलास' बंगल्याचे आवारांतील पहिलें बक्षीस मिळविलेली बागच देते.

नारायणसिंह ज्यांत हात घालतील त्यांत ते पहिल्या नंबरनेंच आजवर आलेले आहेत. नारायणसिंहांनीं राष्ट्रीय चळवळींतहि हिरीरीनें भाग घेऊन मान्यवर नेत्यांना साहाय्य केलें आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
ठुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.

काटकसरी जनांस आवाहन
आजच्या बचतीवर आपल्या
भविष्यकालीन योजना उभारा !
दि बेळगांव बँक लिमिटेड मध्यें
वक्तशीर संचय करा.
शेड्यूल्ड बँक : स्थापना : १९३०
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव,
म्हैसूर राज्य.
सर्व कार्यक्षेत्रांतील लोकांना सोईच्या विविध
बचत योजना.
: महाराष्ट्रांतील शाखा :
जयसिंगपूर, गडहिंग्लज, मिरज, बार्शी, माधवनगर,
सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण, शिरोडें, चिपळूण,
कणकवली, देवगड.
◆ म्हैसूर राज्यांत महत्त्वाच्या गांवीं व व्यापारी केंद्रांत शाखा.
एकूण ठेवी दोन कोटी, पंधरा लक्ष रुपयांवर
ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, २० नोव्हेंबर, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंग कंपनीज अॅक्टमधील संभाव्य दुरुस्त्या

लोकसभेच्या गेल्या अधिवेशनांत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव मांडण्यांत येऊन त्यावर चर्चा झाली होती. मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनीं तूर्त तरी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार सरकार करणार नाहीं, असें उत्तर देऊन ह्या प्रश्नाची तात्पुरती तड लावली. अर्थमंत्र्यांनीं आपल्या उत्तराच्या भाषणांत असें सांगितलें कीं सार्वजनिक मालकीच्या विभागांतील बँका अधिक सबळ करण्यांत येतील, आणि खाजगी मालकीच्या विभागांतील बँकांच्या व्यवहारांत आढळणारे गैरप्रकार जरूर तर बँकिंग कंपनीज अॅक्टमध्यें आणखी दुरुस्ती करून थांबविण्यांत येतील. अर्थमंत्र्यांच्या ह्या भाषणामुळें बँकिंगच्या व्यवसायांत गुंतलेल्या लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत. प्रत्येक बँकवाल्याच्या मनांत बँकिंग कंपनीज अॅक्टमध्यें कशा प्रकारची दुरुस्ती करण्यांत येईल, ह्यासंबंधीं खळबळ माजलेली आहे. ह्या कायद्यांत करण्यांत येणाऱ्या दुरुस्त्यांचा स्टेट बँकेच्या डायरेक्टरांवर जसा परिणाम होईल तसाच तो खाजगी मालकीच्या बँकांच्या डायरेक्टरांवरहि होईल. १९६२ अखेर डायरेक्टरांना अगर बँकांच्या अधिकाऱ्यांना आणि डायरेक्टरांचे हितसंबंध असणाऱ्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या कर्जांची टक्केवारी एकूण कर्जाशीं १३ टक्के पडते. ही टक्केवारी हिंदमधील ४ पहिल्या मोठ्या खाजगी शेड्यूल्ड बँकांची आहे. हीच टक्केवारी स्टेट बँक ऑफ इंडिआच्या बाबतींत २७ आहे, अशी कबुली अर्थमंत्र्यांनीं दिलेली आहे. बँकिंग कंपनीज अॅक्टमध्यें काय दुरुस्त्या करण्यांत येतील ह्यासंबंधीं तर्कवितर्क करण्यांत येत आहेत. ह्या कायद्यांतील १७ वें कलम रिझर्व्ह फंडाबाबत आहे; १८ वें कमल रोख पैसे ठेवण्याबद्दल निर्बंध घालणारें आहे आणि २४ वें कलम गुंतवणुकींचें रोखींत रूपांतर करण्याच्या सुलभतेवर भर देणारें आहे. गेल्या वर्षीं ह्या कलमांत दुरुस्त्या करण्यांत आल्या होत्या. १६ सप्टेंबर १९६४ पासून बँकांना आपल्याजवळच्या एकूण ठेवीपैकीं २८ टक्के रक्कम रोख अगर बोजाविरहित सरकारी रोख्यांत ठेवावी लागणार आहे. सध्यां ही टक्केवारी २० आहे. ह्या कलमांत बहुधा आणखी दुरुस्त्या करण्यांत येणार नाहींत असा अंदाज आहे.

### कायद्यांतील सर्वांत महत्त्वाचें कलम २० वें.

ह्या कलमाप्रमाणें प्रत्येक बँकिंग कंपनीला रिझर्व्ह बँकेकडे, प्रत्येक महिना संपण्यापूर्वीं त्यापूर्वीच्या महिन्यांत बँकेचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या अगर ज्या कंपन्यांत बँकेच्या डायरेक्टरांचे हितसंबंध डायरेक्टर म्हणून अगर मॅनेजिंग एजंट म्हणून अगर कर्जाबद्दल हमी देणारी असामी म्हणून गुंतलेले आहेत अशा कंपन्यांना देण्यांत आलेल्या तारणविरहित कर्जांची माहिती ठराविक पद्धतीप्रमाणें व नमुन्याप्रमाणें द्यावी लागते. २०व्या कलमाच्या तिसऱ्या उपकलमांत ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेला अधिकार देण्यांत आलेले आहेत ह्या अधिकारांचा वापर करून रिझर्व्ह बँक अशा प्रकारचीं आणखी कर्जें देण्यास मनाई करूं शकते किंवा अशीं कर्जें देण्यावर बंधन घालूं शकते. रिझर्व्ह बँकेला योग्य वाटल्यास बँकिंग कंपनीनें दिलेल्या अशा प्रकारच्या कर्जाची परतफेड विवक्षित कालांत करण्यांत यावी असा हुकूम संबंधित बँकेला देतां येतो. हें कलम कायद्यांत मुद्दाम घालण्यांत आलेलें आहे. कारण गत कालांत हिंदमधील बऱ्याच बँकांनीं आपल्या डायरेक्टरांना अगर त्यांच्या कंपन्यांना सढळ हातानें कर्जें देऊन स्वतःचें अस्तित्वच नाहींसें केलें होतें. तथापि अशा प्रकारच्या कर्जावर संपूर्णपणें आणि बिनशर्त बंदी घातल्यामुळें बँकांचाच तोटा होतो. कारण तीमुळें डायरेक्टर बोर्डासाठी महत्त्वाचे आणि अनुभवी उद्योगपती मिळविणें कठीण किंवा अशक्य होऊन बसतें. म्हणूनच कदाचित् हें कलम संदिग्ध ठेवण्यांत आलें असावें. तरीसुद्धां कांहीं मर्यादेपर्यंत कारवाई करण्याची सत्ता रिझर्व्ह बँकेला देण्यांत आली आहे. डायरेक्टरांना देण्यांत येणाऱ्या कर्जाचा प्रश्न मुख्यतः स्टेट बँक आणि एक दोन बँका ह्यांच्यापुरता मर्यादित आहे. ह्यांपैकीं पहिली सार्वजनिक मालकीच्या विभागांतील आणि दुसऱ्या खाजगी मालकीच्या विभागांतील आहेत. पहिल्या बँकेनें दिलेल्या कर्जाचें प्रमाण २७ टक्क्यांइतकें मोठें आहे तर दुसरीचें प्रमाण २५ टक्क्यांइतकें मोठें आहे. दोन्हीं बँकांचीं डायरेक्टर बोर्डस् कोठल्याहि कसोटीला उतरतील इतक्या उच्च प्रतीचीं आहेत. शिवाय, ज्या कंपन्यांना ह्या बँकांनीं कर्जें दिलेलीं आहेत त्यांपैकीं बहुतेक कंपन्या संरक्षणासाठी अगर विकासासाठी लागणारा माल अगर किंमतींची पातळी स्थिर राखण्यासाठी जरूर असणारा माल उत्पादन करीत आहेत. ह्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या कर्जांत काटछाट करण्यांत आली, तर देशांतर्गत गरजांसाठी करण्यांत येणाऱ्या उत्पादनावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं दिलेल्या कर्जाची गुणवत्ता लक्षांत घेऊन, इतर मोठ्या शेड्यूल्ड बँकांनीं डायरेक्टरांना दिलेल्या कर्जाच्या पातळीबरोबर ह्याहि बँकांनीं आपली पातळी खाली आणावी असा हुकूम रिझर्व्ह बँक देत नाहीं असा युक्तिवाद करण्यांत येतो.

### संभाव्य दुरुस्त्यांचें स्वरूप

एखाद्या डायरेक्टराच्या कंपनीला अगर त्याच्या हमीवर देण्यांत येणाऱ्या कर्जावर कमाल मर्यादा घालण्यांत येण्याचा संभव आहे. बँकांचें साधारण भांडवल आणि उभारीत असलेलीं कर्जें ह्यांच्यांत कांहीं प्रमाण ठरविण्यात येण्याची आणि हें प्रमाण डायरेक्टरांच्या कंपन्यांसंबंधीं लागू करण्यांत येण्याची शक्यता आहे. डायरेक्टरांच्या कंपन्यांत ठेवी ठेवण्यात येऊं नयेत असा निर्बंधहि कदाचित् घातला जाईल; कारण, अशा ठेवींमुळें अप्रत्यक्षपणें बँकिंगच्या कायद्याचें काटेकोर नाहीं तरी तत्त्वतः उल्लंघन होतें. डायरेक्टरांना दिलेल्या कर्जांची सध्यांची पातळी खाली आणणें शक्य होणार नाहीं हें मान्य करण्यांत आलेलें आहे. परंतु, रिझर्व्ह बँकेनें तपासणी केल्याशिवाय डायरेक्टरांना आणखी कर्जें मंजूर

# अर्थ

बुधवार, २० नोव्हेंबर, १९६३





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँकिंग कंपनीज ॲक्टमधील संभाव्य दुरुस्त्या

लोकसभेच्या गेल्या अधिवेशनांत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव मांडण्यांत येऊन त्यावर चर्चा झाली होती. मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनीं तूर्त तरी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार सरकार करणार नाहीं, असें उत्तर देऊन ह्या प्रश्नाची तात्पुरती तड लावली. अर्थमंत्र्यांनीं आपल्या उत्तराच्या भाषणांत असें सांगितलें कीं सार्वजनिक मालकीच्या विभागांतील बँका अधिक सबळ करण्यांत येतील, आणि खाजगी मालकीच्या विभागांतील बँकांच्या व्यवहारांत आढळणारे गैरप्रकार जरूर तर बँकिंग कंपनीज ॲक्टमध्यें आणखी दुरुस्ती करून थांबविण्यांत येतील. अर्थमंत्र्यांच्या ह्या भाषणामुळें बँकिंगच्या व्यवसायांत गुंतलेल्या लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत. प्रत्येक बँकवाल्याच्या मनांत बँकिंग कंपनीज ॲक्टमध्यें कशा प्रकारची दुरुस्ती करण्यांत येईल, ह्यासंबंधीं खळबळ माजलेली आहे. ह्या कायद्यांत करण्यांत येणाऱ्या दुरुस्त्यांचा स्टेट बँकेच्या डायरेक्टरांवर जसा परिणाम होईल तसाच तो खाजगी मालकीच्या बँकांच्या डायरेक्टरांवरहि होईल. १९६२ अखेर डायरेक्टरांना अगर बँकांच्या अधिकाऱ्यांना आणि डायरेक्टरांचे हितसंबंध असणाऱ्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या कर्जांची टक्केवारी एकूण कर्जाशीं १३ टक्के पडते. ही टक्केवारी हिंदमधील ४ पहिल्या मोठ्या खाजगी शेडयूल्ड बँकांची आहे. हीच टक्केवारी स्टेट बँक ऑफ इंडिआच्या बाबतींत २७ आहे, अशी कबुली अर्थमंत्र्यांनीं दिलेली आहे. बँकिंग कंपनीज ॲक्टमध्यें काय दुरुस्त्या करण्यांत येतील ह्यासंबंधीं तर्कवितर्क करण्यांत येत आहेत. ह्या कायद्यांतील १७ वें कलम रिझर्व्ह फंडाबाबत आहे; १८ वें कलम रोख पैसे ठेवण्याबद्दल निर्बंध घालणारें आहे आणि २४ वें कलम गुंतवणुकींचें रोख्यांत रूपांतर करण्याच्या सुलभतेवर भर देणारें आहे. गेल्या वर्षी ह्या कलमांत दुरुस्त्या करण्यांत आल्या होत्या. १६ सप्टेंबर १९६४ पासून बँकांना आपल्याजवळच्या एकूण ठेवींपैकीं २८ टक्के रक्कम रोख अगर बोजाविरहित सरकारी रोख्यांत ठेवावी लागणार आहे. सध्यां ही टक्केवारी २० आहे. ह्या कलमांत बहुधा आणखी दुरुस्त्या करण्यांत येणार नाहींत असा अंदाज आहे.

### कायद्यांतील सर्वांत महत्त्वाचें कलम २० वें.

ह्या कलमाप्रमाणें प्रत्येक बँकिंग कंपनीला रिझर्व्ह बँकेकडे, प्रत्येक महिना संपण्यापूर्वी त्यापूर्वीच्या महिन्यांत बँकेचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या अगर ज्या कंपन्यांत बँकेच्या डायरेक्टरांचे हितसंबंध डायरेक्टर म्हणून अगर मॅनेजिंग एजंट म्हणून अगर कर्जाबद्दल हमी देणारी असामी म्हणून गुंतलेले आहेत अशा कंपन्यांना देण्यांत आलेल्या तारणविरहित कर्जांची माहिती ठराविक पद्धतीप्रमाणें व नमुन्याप्रमाणें द्यावी लागते. २० व्या कलमाच्या तिसऱ्या उपकलमांत ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेला अधिकार देण्यांत आलेले आहेत ह्या अधिकारांचा वापर करून रिझर्व्ह बँक अशा प्रकारचीं आणखी कर्जें देण्यास मनाई करूं शकते किंवा अशीं कर्जें देण्यावर बंधन घालूं शकते. रिझर्व्ह बँकेला योग्य वाटल्यास बँकिंग कंपनीनें दिलेल्या अशा प्रकारच्या कर्जांची परतफेड विवक्षित कालांत करण्यांत यावी असा हुकूम संबंधित बँकेला देतां येतो. हें कलम कायद्यांत मुद्दाम घालण्यांत आलेलें आहे. कारण गत कालांत हिंदमधील बऱ्याच बँकांनीं आपल्या डायरेक्टरांना अगर त्यांच्या कंपन्यांना सढळ हातानें कर्जें देऊन स्वतःचें अस्तित्वच नाहींसें केलें होतें. तथापि अशा प्रकारच्या कर्जावर संपूर्णपणें आणि बिनशर्त बंदी घातल्यामुळें बँकांचाच तोटा होतो. कारण तीमुळें डायरेक्टर बोर्डासाठी महत्त्वाचे आणि अनुभवी उद्योगपती मिळविणें कठीण किंवा अशक्य होऊन बसतें. म्हणूनच कदाचित् हें कलम संदिग्ध ठेवण्यांत आलें असावें. तरीसुद्धां कांहीं मर्यादेपर्यंत कारवाई करण्याची सत्ता रिझर्व्ह बँकेला देण्यांत आली आहे. डायरेक्टरांना देण्यांत येणाऱ्या कर्जाचा प्रश्न मुख्यतः स्टेट बँक आणि एक दोन बँका ह्यांच्यापुरता मर्यादित आहे. ह्यांपैकीं पहिली सार्वजनिक मालकीच्या विभागांतील आणि दुसऱ्या खाजगी मालकीच्या विभागांतील आहेत. पहिल्या बँकेनें दिलेल्या कर्जाचें प्रमाण २७ टक्क्यांइतकें मोठें आहे तर दुसरीचें प्रमाण २५ टक्क्यांइतकें मोठें आहे. दोन्हीं बँकांचीं डायरेक्टर बोर्डस् कोठल्याहि कसोटीला उतरतील इतक्या उच्च प्रतीचीं आहेत. शिवाय, ज्या कंपन्यांना ह्या बँकांनीं कर्जें दिलेलीं आहेत त्यांपैकीं बहुतेक कंपन्या संरक्षणासाठी अगर विकासासाठी लागणारा माल अगर किंमतींची पातळी स्थिर राखण्यासाठी जरूर असणारा माल उत्पादन करीत आहेत. ह्या कंपन्यांना देण्यांत आलेल्या कर्जांत काटछाट करण्यांत आली, तर देशांतर्गत गरजांसाठी करण्यांत येणाऱ्या उत्पादनावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं दिलेल्या कर्जांची गुणवत्ता लक्षांत घेऊन, इतर मोठ्या शेडयूल्ड बँकांनीं डायरेक्टरांना दिलेल्या कर्जांच्या पातळीबरोबर ह्याहि बँकांनीं आपली पातळी खालीं आणावी असा हुकूम रिझर्व्ह बँक देत नाहीं असा युक्तिवाद करण्यांत येतो.

### संभाव्य दुरुस्त्यांचें स्वरूप

एखाद्या डायरेक्टराच्या कंपनीला अगर त्याच्या हमीवर देण्यांत येणाऱ्या कर्जावर कमाल मर्यादा घालण्यांत येण्याचा संभव आहे. बँकांचें साधारण भांडवल आणि उभारीत असलेलीं कर्जें ह्यांच्यांत कांहीं प्रमाण ठरविण्यात येण्याची आणि हें प्रमाण डायरेक्टरांच्या कंपन्यांसंबंधीं लागू करण्यांत येण्याची शक्यता आहे. डायरेक्टरांच्या कंपन्यांत ठेवी ठेवण्यात येऊं नयेत असा निर्बंधहि कदाचित् घातला जाईल; कारण, अशा ठेवींमुळें अप्रत्यक्षपणें बँकिंगच्या कायद्याचें काटेकोर नाहीं तरी तत्त्वतः उल्लंघन होतें. डायरेक्टरांना दिलेल्या कर्जांचीं सध्यांची पातळी खालीं आणणें शक्य होणार नाहीं हें मान्य करण्यांत आलेलें आहे. परंतु, रिझर्व्ह बँकेनें तपासणी केल्याशिवाय डायरेक्टरांना आणखी कर्जें मंजूर

न होण्याची शक्यता आहे. कांहीं ठिकाणीं निवृत्तीचें वय झालेलें असतांनासुद्धां डायरेक्टर्स स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी अगर त्यांचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांना बँकेकडून मिळणाऱ्या सवलतीसाठी बँकांच्या डायरेक्टरपदाला चिकटून बसलेले दिसतात. अशा डायरेक्टरांना टप्प्याटप्प्यानें निवृत्त करण्यांत येण्याची शक्यता आहे. बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर छोट्या भागधारकांना प्रतिनिधित्व देण्यांत येण्याची शक्यता आहे. बँकेच्या कारभारांत समतोल राखण्याच्या दृष्टीनें मोठ्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे डायरेक्टर्स आणि छोट्या भागधारकांचे डायरेक्टर्स ह्यांच्या संख्येंत कांहीं प्रमाण निश्चित केलें जाण्याचा संभव आहे. मोठ्या कंपन्यांच्या डायरेक्टरांनीं अगर समर्थ हितसंबंधांनीं केलेले गैर प्रकार उघडकीस आणण्याच्या कामीं छोट्या भागधारकांचे प्रतिनिधि जागरूक असतात, असें सामान्यतः दिसून येतें. शिवाय त्यामुळें कारभारांतील खर्चांत बचत होऊं शकेल. तथापि रिझर्व्ह बँकेसारख्या एखाद्या मध्यवर्ती संस्थेकडून बँकिंगच्या पद्धतींतील सर्व दोष काढून टाकणें अवघड काम आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यासाठी अंतर्गत तोल सांभाळणाऱ्या एखाद्या विधिनियम-पद्धतीची आवश्यकता आहे. ह्या दृष्टीनें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर ठेवीदारांना प्रतिनिधित्व देणें इष्ट ठरेल. ठेवीदारांचे डायरेक्टर्स ठेवलेल्या ठेवींच्या लहानमोठेपणावर निवडले जावे. ते स्वतः-च्या हितसंबंधांचें रक्षण करतील, ज्या भागधारकांचा मूळचा भागभांडवलाचा आधार बेताबेताचा असूनहि ज्यांचे हात त्याच्या आधारानें सार्वजनिक मालकीच्या मोठ्या निधींपर्यंत पोंच-तात अशा भागभांडवलधारकांच्या हितसंबंधाविषयीं त्यांना आस्था नसते. डायरेक्टर बोर्डावर ठेवीदारांचे प्रतिनिधि घेतल्यानें बँकिंगच्या पद्धतीमधील दोष कमी होण्यास मदत होण्याची शक्यता आहे.

## चीन–जपानमधील सौदा

जपाननें कृत्रिम तंतु निर्माण करणारा एक आख्खा कारखाना चीनला विकत देण्याचें कबूल केलें आहे. कारखान्यासाठी चीननें २ कोटी डॉलर्स द्यावे लागतील. चीननें खरेदीची किंमत ६ वर्षांत द्यावयाची आहे. जपानच्या ह्या व्यवहाराबद्दल अमेरिकेनें तक्रार केली आहे. अमेरिकेनें जपानला केलेल्या मदतीमुळेंच हा व्यवहार शक्य झाला आणि त्यामुळें अमेरिकेनें चीनलाच अप्रत्यक्षरीत्या मदत केल्यासारखें झालें आहे. चीन व अमेरिका ह्यांच्यामधील वैराच्या भावनेशीं अगदीं विसंगत असा हा व्यवहार आहे. कॅनडाकडून रशियानें मोठ्या प्रमाणावर गहूं खरेदी करण्याचा करार केल्यावर त्यांतील कांहीं गहूं क्यूबामधील कॅस्ट्रोच्या सर-कारला मिळणार आहे. ह्या व्यवहारासंबंधीं अमेरिका कॅनडावर नाराज आहे.

## यांत्रिक हत्यारांचा आणखी एक कारखाना

यांत्रिक हत्यारांचा आणखी एक कारखाना काढण्याचा निर्णय मध्यवर्ती सरकारनें घेतला आहे. हैद्राबाद येथें काढण्यांत यावयाचा हा कारखाना सार्वजनिक मालकीचा राहील. अशा प्रकारचा हा पांचवा कारखाना असून त्याच्या उभारणीसाठी ७·५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. हा खर्च भारत सरकार करणार आहे. केरळमध्यें काढण्यांत येत असलेल्या कारखान्याचें भांडवल मात्र हिंदुस्थान मशीन टूल्स हा कारखाना स्वतः उभें करणार आहे. हैद्राबाद येथील कारखाना १८ महिन्यांच्या अवधींत प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | |
|---|---|
| चालू ठेव ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज ... ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | |
|---|---|
| १ महिना ... ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने ... ... | ३·५० टक्के |
| ६ महिने ... ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर ... ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



★ सहकाराच्या क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा महाराष्ट्राला अभिमान वाटतो ★

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

*सुद्धां आपल्या ५१ वर्षांवरील सेवेचा अभिमान बाळगते.*

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल ... | ४ कोटी ५६ लाख |
| गंगाजळी व फंड ... | १ कोटी २६ लाख |
| ठेवी ... | ३० कोटी १३ लाख |
| खेळतें भांडवल ... | ६५ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेंत वाढत्या प्रमाणांत ठेवी ठेवून राज्यांतील शेतकऱ्यांना सहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

निरनिराळ्या आकर्षक योजनांसाठी तुमच्या नजिकच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कोणत्याहि शाखेकडे चौकशी करा.

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
: प्रादेशिक कचेरी : महाल : नागपूर.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

बृहन्मुंबईंतील शाखा : (१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम

## भांडवलाच्या गुंतवणुकीला करांचा अडथळा

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. भारत राम ह्यांनीं कानपूर येथें बोलतांना भांडवलाची गुंतवणूक आणि कर ह्यांच्या संबंधांबाबत कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले. संघटनेच्या उत्तर भारतामधील स्थानिक परिषदेपुढें ते बोलत होते. ते म्हणाले कीं, भांडवलाची गुंतवणूक अडथळ्यावांचून चालू राहावयाची असेल तर करांची आकारणी भांडवलाच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी असली पाहिजे. सध्यां उद्योगधंद्यांवर जबर कर बसविण्यांत आलेले आहेत. त्यामुळें भांडवलाचा संचय होण्यास फारसा वाव राहिलेला नाहीं. त्यांना लागणारा पैसा द्रव्यविषयक संस्थांच्या मार्फत उपलब्ध करून दिल्यानें प्रश्न सुटण्यासारखा नाहीं. कंपन्यांवर बसविण्यांत आलेला जबर कॉर्पोरेशन कर आणि सुपरटॅक्स ह्यांच्यामुळें कंपन्यांनीं काढलेल्या कर्जाच्या परत फेडीच्या जबाबदाऱ्या पार पाडणें अतिशय कठीण जात आहे. ह्या जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या असतील तर नफ्याच्या वांटपावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहीं. देशाच्या अर्थव्यवस्थेंत शेतीच्या उत्पादनाला फार महत्त्व आहे. कारण, देशाच्या एकूण उत्पन्नांत शेतीच्या उत्पन्नाचा हिस्सा अजूनहि बराच आहे. पण शेतीच्या उत्पादनांत वाढ झालेली नाहीं, अन्नधान्याचें उत्पादन अजूनहि ८ कोटी टनांच्या आसपास घोटाळत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाची गरज आणि संरक्षणकार्यासाठी लागणारीं साधनें ह्यांचा विचार करतां ह्या परिस्थितीचें गांभीर्य सहज लक्षांत येतें. संरक्षण आणि विकास ह्यांच्यासाठी लागणारी साधन-संपत्ति शेतीच्या व्यवसायांतून मिळत नसल्यानें हा भार अर्थव्यवस्थेच्या इतर बाजूवर पडतो. पण बिगर-शेती विभागाकडून मिळूं शकणाऱ्या साधन-संपत्तीलाहि कांहीं मर्यादा आहेच.

## ब्रिटनमधील कामगारांत स्त्रियांचा भरपूर भरणा

ब्रिटिश सरकारनें आपल्या उद्योगधंद्यासंबंधीं माहिती देणारें एक चोपडें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. ह्या चोपड्यांत दिलेल्या माहितीवरून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेंत स्त्री-कामगारांची संख्या किती महत्त्वाची झाली आहे तें समजून येतें. ब्रिटनमधील कामगारवर्गांत स्त्री-कामगारांची संख्या ८० लाखांहूनहि अधिक आहे. ह्यावरून स्त्री-कामगारांच्या कष्टाशिवाय ब्रिटिश अर्थव्यवस्था चालू शकणार नाहीं हें उघडच होतें. रोजगारीवर असणाऱ्या प्रत्येक तीन कामगारांत एक स्त्री असते. १९६२ च्या मध्याच्या सुमारास तपासणी करण्यांत आली असता असें आढळून आलें कीं स्त्री कामगारांच्या एकूण संख्येपैकीं निम्म्या कामगार-स्त्रिया विवाह झालेल्या होत्या. १९३१ सालीं प्रत्येक १० विवाहित स्त्रियांपैकी एक जण बाहेर कामाला जाणारी होती. आतां हें प्रमाण ३ विवाहित स्त्रियांमागें १ नौकरीसाठी बाहेर जाणारी असें आहे. ८० लाख स्त्रियांपैकी ५० लाख स्त्रिया व मुली इस्पितळें, शाळा, रेस्टॉरंटस् आणि दुकानांतून कामें करीत आहेत. ह्या क्षेत्रांतून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अजूनहि वाढतच आहे. गेल्या १० वर्षांत ह्या क्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ८ लाखांनीं वाढलेली आहे. इतर कोणत्याहि उद्योगधंद्यापेक्षा कपडे आणि पादत्राणाच्या धंद्यांत काम करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण सर्वांत अधिक आहे. ह्या धंद्यांतील एकूण कामकऱ्यांपैकीं तीन चतुर्थांश स्त्रिया आहेत. अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या एकदम झपाट्यानें वाढलेली दिसून येते. १९५१ मध्यें अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ७॥ लाख होती. आतां त्यांची संख्या १२॥ लाखांपर्यंत आली आहे.

## सेंट्रल बँकेच्या भांडवलांत वाढ


सेंट्रल बँक ऑफ इंडियानें २५ रु. भरण्याचे ६·३५ लक्ष इक्विटी भाग काढण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक भागावर ६ रु. प्रिमियम पडेल. प्रिमिअमची एकूण रक्कम ३१·७५ लक्ष रु. होईल, ती शेअर प्रिमिअम खातीं वर्ग केली जाईल. प्रत्येक जुन्या दोन भागांस नवा एक भाग मिळूं शकेल. ऑक्टोबर, १९६२ मध्यें बँकेला १० रु. वाढाव्यानें भाग विकण्यास कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें संमति दिली होती. परंतु आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्यामुळें नवे भाग देण्याचें स्थगित करण्यांत आलें. वाढाव्याची रक्कम १० रु. ची उतरवून ५ रु. करण्यांत आली आहे. बँकेचे वसूल भांडवल आतां पूर्वीच्या दीडपट होईल.

## गुन्हेगारांना जमीन देणार ?

राजस्थानमध्यें काढण्यांत येणाऱ्या कालव्याच्या कामावर शिक्षा झालेले कांहीं गुन्हेगार काम करीत आहेत. त्यांच्यापैकी चांगल्या वर्तणुकीच्या गुन्हेगारांना जमिनी देऊन त्यांची वसाहत करण्याचा विचार राजस्थान सरकार करीत आहे. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी त्यांच्या खुल्या छावण्या स्थापन करण्याचे प्रयोग चार राज्यांत यशस्वी झालेले आहेत. राजस्थानमधील कालव्याच्या कामावर सध्या ३८ गुन्हेगार काम करीत असून आपली भाकरी स्वतः मिळवून खात आहेत.

## एअर इंडियानें मिळवून दिलेली हुंडणावळ

एअर इंडियानें १९५६-५७ ते १९६१-६२ ह्या काळांत एकूण १९·५२ कोटी रुपयांच्या परदेशी हुंडणावळाची प्रत्यक्ष मिळकतीनें किंवा काटकसरीनें भर घातली.

## नाझी राजवटीनें सरोवरांत दडविलेली संपत्ति

दुसरें महायुद्ध संपून आतां १८ वर्षांचा काळ लोटला आहे. नाझी जर्मनीचा पराभव अटळ दिसू लागतांच त्या राजवटींत भरभराटीस चढलेले हजारों अधिकारी वाट फुटेल तिकडे पळू लागले. पण ते नुसतेच वस्त्रनिशी पळाले नाहींत. त्यांपैकी कित्येकांनीं शक्य असेल तेवढी संपत्ति घेऊन जर्मनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. कित्येकांनीं हे प्रयत्न सफल होण्याची आशा मावळतांच गोळा केलेली संपत्ति दडवून ठेवली. ऑस्ट्रिआंतील एका सरोवरांत अशी संपत्ति दडवल्याच्या वार्ता युद्धानंतर प्रसृत झाल्या. ह्या सरोवराच्या तळांतून दडवलेली संपत्ति बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या शोधासाठी खुद्द ऑस्ट्रिआचें सरकार २० हजार पौंड खर्च करीत आहे. सरोवराच्या काठीं ३०० पोलिसांचा जागता पहारा असून मोटारबोटी आणि हेलिकॉप्टर्स टेलिव्हिजनच्या कॅमेऱ्यांच्या साह्यानें सरोवराचा तळ धुंडाळीत आहेत. ह्या सरोवराच्या तळाशीं सोन्यानें खचून भरलेल्या पेट्या, जर्मन राजवटीच्या गुप्त फाइली आणि स्वित्झरलंडच्या बँकांतून ठेवण्यांत आलेल्या सोन्याच्या ठेवींचे सांकेतिक क्रमांक हातीं लागतील, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. ऑस्ट्रिअन सरकारच्या ह्या प्रयत्नापूर्वी कांहीं खाजगी व्यक्तींनींहि सरोवरांतील गुप्त धन काढण्याचे प्रयत्न केले होते. हॅम्बुर्गमधील एका मासिकानें सरोवरांतून ७ जड पेट्या वर काढण्यांत यश मिळविलें होतें. ह्या पेट्यांतून ९० लाख पौंडांच्या ब्रिटिश बँकांच्या खोट्या नोटा भरलेल्या आढळून आल्या. रशिआ आणि इस्राइल सरकारच्या गुप्त पोलीस खात्यांनीं नाझींच्या हस्तकांच्या गुप्त याद्या हस्तगत करण्याचे प्रयत्न केलेले होते. ह्यांपैकी कांहीं हस्तक अजूनहि पश्चिम जर्मनींत अधिकाराच्या जागांवर आहेत, असें म्हणतात.

## जर्मन स्त्रियांना समानतेचे हक्क

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४९ सालीं पश्चिम जर्मन लोकसत्ताक राज्याची स्थापना करण्यांत आली. त्या वेळीं राज्यघटनेंत बदल करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क देण्यांत आले. त्याचा फायदा घेऊन जर्मन स्त्रिया आता वकिली, धर्मोपदेशक, कारखान्यांचे कायदेशीर सल्लागार, इत्यादि अनेक क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें कामें करीत आहेत. पण ह्या समानतेच्या वाऱ्याचा त्यांना त्रासहि सोसावा लागत आहे. एखाद्या बसमध्यें अगर ट्रॅममध्यें जर्मन स्त्री चढल्यास पूर्वी जवळपासचा पुरुष सौजन्य दाखवून आपली जागा त्या स्त्रीस देत असे. पण आतां तसें होत नाहीं. मोठ्या रस्त्यावरून जातांना शहरांतील लोक एकमेकांस मागें सारून पुढें जाण्याचा प्रयत्न करीत असतात; आणि भाऊगर्दीत स्त्रिया स्वतः सुद्धां मागे असत नाहींत. एखाद्याला धक्का लागल्यास दिलगिरी प्रदर्शित करण्याची तसदीहि फारशी कोणी घेत नाहीं. सार्वजनिक वाहनांत एखादी म्हातारी अगर गर्भवती बाई शिरल्यास जागा नसेल तर तिला उभ्यानेंच प्रवास करावा लागतो; पुरुष वृत्तपत्रा आड आपलें तोंड लपवून तसेंच बसून राहतात! जर्मन स्त्रियाहि पूर्वीसारख्या राहिलेल्या नाहींत. आगगाडींतून जातांना धूम्रपानाविरुद्ध असलेल्या सूचनापालन त्या करीत नाहींत. पुरुषांप्रमाणें त्याहि धूम्रपान करीत असतात. टेलिफोनवर काम करणारे लोक, कारकून, इत्यादी नोकर तुसडेपणानें वागतांना आढळतात. सार्वजनिक कचेऱ्यांतून पुरुषाइतक्याच उद्दामपणानें वागणाऱ्या स्त्रिया कांहीं कमी नाहींत. एकंदरीनें, स्त्रियांना देण्यांत आलेल्या समानतेच्या अधिकारांचें तारूं कोठें भरकटत चाललें आहे, तें कळणें कठीण झालें आहे. ह्या बाबतींत पश्चिम जर्मनींच्या मोठ्या शहरांतील स्त्रिया न्यूयॉर्क, लंडन, पॅरिससारख्या शहरांतील स्त्रियांच्या पावलावर पावलें टाकीत आहेत.

## हंगेरीच्या भरभराटीचें रहस्य काय?

१९५६ सालीं हंगेरींत झालेला स्वातंत्र्यवाद्यांचा उठाव रशिआनें लष्करी सामर्थ्य वापरून मोडून काढला. त्यानंतर तेथील आर्थिक परिस्थिति खालावली होती. परंतु गेल्या सात वर्षांच्या काळांत त्या देशानें पुन्हा भरभराट प्राप्त करून घेतली आहे. आज हंगेरीचें सरकार स्थिर पायावर उभें राहिलेलें दिसत आहे. त्याचें श्रेय पंतप्रधान कादर ह्यांच्या व्यावहारिक धोरणाला द्यावें लागेल. निदान आज तरी हंगेरीचें सरकार शेतकऱ्यांचा छळ करीत नाहीं. सामुदायिक सरकारी मालकीच्या शेतवाड्या स्थापन करण्याऐवजीं शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना उत्तेजन देण्यांत येत आहे. शेतकऱ्यांकडे त्यांच्या मालकीच्या जमिनींचे हक्क कायम ठेवण्यांत आलेले आहेत. ह्या जमिनीची मशागत आपल्या मनाप्रमाणें करण्याचें स्वातंत्र्य त्यांना देण्यांत आलेलें आहे. शेतमालाच्या उत्पादनापैकी किती भाग सरकारला विकावयाचा, किती भाग खुल्या बाजारांत विकावयाचा आणि किती भाग स्थानिक वापरासाठी ठेवावयाचा ह्यासंबंधींचे निर्णय शेतकरी स्वतंत्रपणें घेऊं शकतात. त्यामुळें शेतीच्या उत्पादनांत बरीच वाढ झाली असून खाद्यपदार्थांच्या दुकानांत समृद्धि दिसून येऊं लागली आहे. ज्याला अमेरिकेंत 'समृद्ध समाज' म्हणतात तशा प्रकारचा समाज अलीकडे हंगेरींत दिसू लागण्याचीं चिन्हें आहेत. आजच्या हंगेरींत खाजगी मालकीच्या अवघ्या ४५ हजार मोटारगाड्या आहेत. पण दोन वर्षांपूर्वी त्यांची संख्या निम्मीच होती. मोटारगाडीची किंमत १ हजार पौंडांच्या आसपास असल्यानें ती विकत घेणें सामान्य कामगाराला शक्यच नव्हतें. परंतु आतां वेतन वाढल्यानें कामगार गाड्या घेऊं लागले आहेत. बुडापेस्ट शहरांतील दुकानांतून चैनीच्या वस्तूंची रेलचेल दिसून येते.

## जपानच्या रेल्वे-प्रमुखाचा राजीनामा

अलीकडे जपानच्या रेल्वेवर याकोहामा येथें अपघात होऊन १६४ माणसें मरण पावलीं. ह्या अपघातांची जबाबदारी स्वतःवर घेऊन जपान नॅशनल रेल्वेच्या अध्यक्षांनीं राजीनामा देण्याचें ठरविलें आहे. जपानमधील रेल्वेमार्गांवर अशा प्रकारचा भयानक अपघात झाल्यास रेल्वेच्या अध्यक्षांनीं राजीनामा देण्याची परंपराच तेथें रूढ आहे. जपानी आगगाड्या अतिशय वेगानें धावतात. त्यामुळें रेल्वे-अपघात होण्याचा संभव अधिक असतो. जपानी गाड्या वक्तशीरपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. वेगानें पाठोपाठ धावणाऱ्या गाड्यांत कित्येकदा कांहीं मिनिटांचेंच अंतर असतें. जपानमध्यें दरसाल १० हजार माणसें रेल्वे-अपघातांत निधान पावतात. त्यांपैकी बरेच जण रक्षण नसलेल्या रेल्वेफाटकांचें उल्लंघन करतांना दगावतात.

## विद्युत्गृहासाठी पोलंडची मदत

पोलंड आणि भारत ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार करण्यांत आला आहे. कराराला अनुसरून पोलंडचें सरकार भारताला वीजगृहांच्या बांधणीसाठी ३ कोटी डॉलर्सचें कर्ज देणार आहे. कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी पोलंडनें दिलेल्या कर्जाप्रमाणेंच ह्याहि कर्जाच्या अटी असतील. वीजगृहांना लागणारी यंत्रसामग्री पुरवून त्यांच्या उभारणीसाठी पोलिश तंत्रज्ञहि भारतांत येणार आहेत.

## स्वीडनची कागदाची देणगी

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना लागणारीं पाठपुस्तकें छापण्यासाठी स्वीडनच्या सरकारनें भारताला ८,००० टन कागद देणगीदाखल दिला आहे. सुमारें २,००० टन कागद घेऊन एक बोट लवकरच कलकत्ता बंदरांत येणार आहे.

### तेलखाणीच्या धंद्याची यंत्रसामग्री

खनिज तेलाच्या खाणी खणण्याची यंत्रसामग्री पुरविण्याबाबत रशिआ आणि भारताचें तेल व नैसर्गिक वायु-मंडळ ह्यांच्यांत लवकरच करार करण्यांत येणार आहे. करारांत ठरविण्यांत आल्याप्रमाणें रशिआ भारताला ९ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री पुरविणार आहे. त्याशिवाय कोयाली आणि बैरोनी ह्या ठिकाणीं तेलशुद्धीचे कारखाने उभारण्याच्या कामीं आणि हिंदी तंत्रज्ञांना तेलाच्या कारखान्याबद्दलचें शिक्षण देण्याचेंहि रशिआनें मान्य केलें आहे. रशिआच्या सहकार्यानें तेलाच्या १४० विहिरी आतांपर्यंत खोदण्यांत आल्या असून त्यांपैकीं ९० टक्के म्हणजे १२५ विहिरींत तेल सापडलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताचें तेल व नैसर्गिक वायु-मंडळ ३५ लाख टन तेलाचें उत्पादन करूं लागेल.

### खाकसार पुढाऱ्याची मोठी मालमत्ता

भारतांत व पाकिस्तानांत खाकसार चळवळीची स्थापना करणारे पुढारी अल्लामा मश्रिकी ह्यांनीं मृत्यूपूर्वी कांहीं तासच मृत्युपत्र करून ३७ लाख रुपयांच्या आपल्या मालकीची विल्हेवाट लावली. मृत्युपत्राप्रमाणें ९ लाख रुपये खाकसार चळवळीच्या पुनरुत्थानासाठी आणि १२ लाख रुपये गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठी खर्च करावयाचे आहेत. २ लाख रुपये त्यांनीं आपल्या कबरीसाठी राखून ठेवले आहेत. कबर कशी असावी हें त्यांनीं सांगून ठेवलें आहे. कबरीवर घड्याळ असणारा एक मनोरा बांधण्यांत यावा अशी त्यांची सूचना आहे. पाकिस्तानांतील लोकांना वेळेचें महत्त्व कळावें म्हणून घड्याळ बसविण्यांत येणार आहे. बाकीची रक्कम त्यांच्या दोन विधवांना पेन्शन देण्यासाठी खर्च करण्यांत यावयाची आहे.

### भारतामधील फौंटनपेन्सचा धंदा

भारताच्या फौंटनपेन्स तयार करण्याच्या धंद्याची पहाणी करून त्याच्या वाढीसाठी व सुधारणेसाठी सूचना करण्याचें काम संयुक्त-राष्ट्रसंघटनेनें दोघा जपानी तज्ज्ञांवर सोंपविलें आहे. भारतांत तयार होणारीं फौंटनपेन्स जगन्मान्य व्हावीं म्हणून काय करावें, ह्याविषयीं आपल्या शिफारसी ते भारत सरकारकडे सादर करणार आहेत. आंध्रमधील एका प्रसिद्ध फौंटनपेनच्या कारखान्यांत बोलतांना जपानी तज्ज्ञांनीं असें मत व्यक्त केलें कीं भारतांत तयार होणारीं पेन्स टिकाऊ करण्यांत आलीं पाहिजेत; एक वर्षभर तरी तीं दुरुस्तीशिवाय नीट चाललीं पाहिजेत. त्यांची बनावट उच्च दर्जाची असली पाहिजे आणि ती किंमतीच्या दृष्टीनें लोकांना परवडण्यासारखी असली पाहिजेत. जपानमधील फौंटनपेन्सच्या धंद्याला १८९६ सालीं प्रारंभ झालेला आहे. तेव्हांपासून ह्या धंद्यानें तेथें चांगला जम बसविला आहे.

### २,३०० लष्करी अधिकाऱ्यांची भरती

१९६३ च्या सुरवातीपासून २,३०० लष्करी अधिकाऱ्यांची आणीबाणीची कमिशन्स देऊन लष्करांत भरती करण्यांत आली आहे. त्यांपैकी १,५८० अधिकारी डेहराडून येथील लष्करी ॲकॅडमींतून दोन अभ्यासक्रम पार पाडल्यावर भरती झालेले आहेत. ७८० अधिकारी पुणें व मद्रास येथें स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या सैनिकी शाळांतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांतून भरती करण्यांत आले. ह्या शाळांमधून आणखी १,२०० अधिकारी लवकरच त्यांचा अभ्यासक्रम पुरा करतील. आणीबाणीचीं कमिशन्स देण्यांत आलेल्या लष्करी अधिकाऱ्यांचा अभ्यासक्रम ६ महिन्यांचा असतो. लष्करांत नियमित कमिशन्स देण्यांत येणाऱ्या अधिकाऱ्यांचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असतो.


दि सरदार
कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक
कारबोनिक ॲसिड गॅस
सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी
आणि
खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्‌चें ऑफिस
सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी
१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६२१२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. १०८
३ दिल्ली-रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता-१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७-२२४७
५ विजयवाडा-गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी-डलहौसी रोड.


सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

## पोस्टाच्या सोयींत झालेली वाढ

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील पोस्ट खात्याचें ठरविलेलें उद्दिष्ट गांठलें जाईल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. सध्यां देशांतलि पोस्टऑफिसांची संख्या ८८,७९३ इतकी आहे. त्यांपैकी ८०,६५४ पोस्ट ऑफिसें ग्रामीण भागांत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २३,००० जादा पोस्टऑफिसें उघडण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी ११,२५० पोस्टऑफिसें गेल्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीपर्यंत उघडण्यांत आलीं आहेत. त्यावरून, ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट गांठण्याच्या कामीं अडचणी येण्याचा संभव वाटत नाहीं. पोस्टाची सोय वाढविण्याच्या कार्यक्रमांत मागासलेल्या भागांकडे विशेष लक्ष देण्यांत येणार आहे. वन्य जमातींची वस्ती असलेल्या भागांत आणि वाहतुकीच्या सोयी उपलब्ध नसलेल्या भागांतहि पोस्टानें पत्रें पाठविण्याची सोय करण्यांत येणार आहे. भारतांत सुमारें ५ लाख खेडीं आहेत. ह्या खेड्यांपैकी अंदाजें ३०० खेडीं सोडून बाकीच्या सर्वांत टपाल पाठविण्याची सोय करण्यांत आली आहे. बहुतेक खेड्यांतून पोस्टमनकडूनच टपालाचा वटवडा करण्यांत येतो. परंतु कांहीं भागांत खास तात्पुरतीं माणसें नेमून टपाल नेण्याची व्यवस्था चालू करण्यांत आली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशांत पोस्टाची सोय देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोंचविण्याचें काम कांहींसें अडचणीचें आणि कालावधीचें आहे. तथापि, आधुनिक जीवनाचे वारे सर्व देशभर खेळविण्याच्या कामीं टपाल ह्या संस्थेचें महत्त्व वादातीत आहे. पोस्टखातें ग्रामीण भागांतील पोस्टाच्या सोयींकडे अधिक लक्ष देत आहे, तें योग्यच आहे. कारण, ग्रामीण भाग त्यामुळें बाह्य जगाशीं जोडले जातात.

## परदेशीय भांडवलाची गुंतवणूक

गेल्या हिंवाळ्यांत भारतावर चीननें आक्रमण केल्यामुळें परदेशीय भांडवलाच्या भारतामधील गुंतवणुकीचें भवितव्य कांहींसें निराशाजनक झालें होतें. त्यानंतर जाहीर करण्यांत आलेली आणीबाणीची परिस्थितीहि अशा गुंतवणुकीला पोषक नव्हतीच. परंतु आतां ह्याबाबतची परिस्थिति कांहीं महिन्यांत सुधारण्याची शक्यता वाटत आहे. भारतामधील उद्योगपति आणि परदेशीय उद्योगपति ह्यांच्यांतील औद्योगिक सहकार्याच्या वाटाघाटी करण्यास दिल्लींतील उन्हाळ्याचे दिवस उपयुक्त ठरत नाहींतच. हिंवाळा सुरू झाल्यावर मात्र ह्या वाटाघाटींना चांगला भर येईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. खाजगी मालकीच्या भांडवलाच्या गुंतवणुकीच्या दृष्टीनें कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांत ऑस्ट्रेलिआच्या खालोखाल भारत हाच फलप्रद असा मानला जातो. मात्र परदेशीय उद्योगपतींना भांडवल गुंतविण्यासाठी ज्या नियमांच्या चाकोरींतून जावें लागतें, ते नियम त्यांना त्रासदायक आणि अकारण विलंब लावणारे वाटतात. भारताच्या उद्योगधंद्यांशीं सहकार्य करणारें परदेशी भांडवल सुपर टॅक्सच्या कक्षेंत येतें; पण त्याचा परिणाम मानसिक स्वरूपाचाच अधिक आहे. ह्या कराविरुद्ध भारतीय उद्योगपतींनीं जोराची तक्रार केलेली आहे. भांडवलाच्या गुंतवणुकीबद्दल भारत सरकारनें अमेरिकेला ज्या प्रकारची हमी दिली आहे तशीच हमी पश्चिम जर्मन सरकारलाहि देण्यास सरकार तयार आहे. परंतु पश्चिम जर्मन सरकार भांडवल गुंतवणुकीसंबंधीं सर्वच संबंधित देशांकडून अधिक चांगल्या प्रकारच्या हमीची अपेक्षा करीत असते. भारत-सरकार मात्र अमेरिकेला दिलेल्या हमीपेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेची हमी द्यावयास तयार नाहीं.




## पोस्टाच्या सोयींत झालेली वाढ

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील पोस्ट खात्याचें ठरविलेलें उद्दिष्ट गांठलें जाईल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. सध्यां देशांतलि पोस्टऑफिसांची संख्या ८८,७९३ इतकी आहे. त्यांपैकी ८०,६५४ पोस्ट ऑफिसें ग्रामीण भागांत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २३,००० जादा पोस्टऑफिसें उघडण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी ११,२५० पोस्टऑफिसें गेल्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीपर्यंत उघडण्यांत आलीं आहेत. त्यावरून, ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट गांठण्याच्या कामीं अडचणी येण्याचा संभव वाटत नाहीं. पोस्टाची सोय वाढविण्याच्या कार्यक्रमांत मागासलेल्या भागांकडे विशेष लक्ष देण्यांत येणार आहे. वन्य जमातींची वस्ती असलेल्या भागांत आणि वाहतुकीच्या सोयी उपलब्ध नसलेल्या भागांतहि पोस्टानें पत्रें पाठविण्याची सोय करण्यांत येणार आहे. भारतांत सुमारें ५ लाख खेडीं आहेत. ह्या खेड्यांपैकी अंदाजें ३०० खेडीं सोडून बाकीच्या सर्वांत टपाल पाठविण्याची सोय करण्यांत आली आहे. बहुतेक खेड्यांतून पोस्टमनकडूनच टपालाचा बटवडा करण्यांत येतो. परंतु कांहीं भागांत खास तात्पुरतीं माणसें नेमून टपाल नेण्याची व्यवस्था चालूं करण्यांत आली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशांत पोस्टाची सोय देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोंचविण्याचें काम कांहींसें अडचणीचें आणि कालावधीचें आहे. तथापि, आधुनिक जीवनाचे वारे सर्व देशभर खेळविण्याच्या कामीं टपाल ह्या संस्थेचें महत्त्व वादातीत आहे. पोस्टखातें ग्रामीण भागांतील पोस्टाच्या सोयींकडे अधिक लक्ष देत आहे, तें योग्यच आहे. कारण, ग्रामीण भाग त्यामुळें बाह्य जगाशीं जोडले जातात.

## परदेशीय भांडवलाची गुंतवणूक

गेल्या हिंवाळ्यांत भारतावर चीननें आक्रमण केल्यामुळें परदेशीय भांडवलाच्या भारतामधील गुंतवणुकीचें भवितव्य कांहींसें निराशाजनक झालें होतें. त्यानंतर जाहीर कारण्यांत आलेली आणीबाणीची परिस्थितीहि अशा गुंतवणुकीला पोषक नव्हतीच. परंतु आतां ह्याबाबतची परिस्थिति कांहीं महिन्यांत सुधारण्याची शक्यता वाटत आहे. भारतामधील उद्योगपति आणि परदेशीय उद्योगपति ह्यांच्यांतील औद्योगिक सहकार्याच्या वाटाघाटी करण्यास दिल्लींतील उन्हाळ्याचे दिवस उपयुक्त ठरत नाहींतच. हिंवाळा सुरू झाल्यावर मात्र ह्या वाटाघाटींना चांगला भर येईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. खाजगी मालकीच्या भांडवलाच्या गुंतवणुकीच्या दृष्टीनें कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांत ऑस्ट्रेलिआच्या खालोखाल भारत हाच फलप्रद असा मानला जातो. मात्र परदेशीय उद्योगपतींना भांडवल गुंतविण्यासाठी ज्या नियमांच्या चाकोरींतून जावें लागतें, ते नियम त्यांना त्रासदायक आणि अकारण विलंब लावणारे वाटतात. भारताच्या उद्योगधंद्यांशीं सहकार्य करणारें परदेशी भांडवल सुपर टॅक्सच्या कक्षेंत येतें; पण त्याचा परिणाम मानसिक स्वरूपाचाच अधिक आहे. ह्या कराविरुद्ध भारतीय उद्योगपतींनीं जोराची तक्रार केलेली आहे. भांडवलाच्या गुंतवणुकीबद्दल भारत सरकारनें अमेरिकेला ज्या प्रकारची हमी दिली आहे तशीच हमी पश्चिम जर्मन सरकारलाहि देण्यास सरकार तयार आहे. परंतु पश्चिम जर्मन सरकार भांडवल गुंतवणुकीसंबंधीं सर्वच संबंधित देशांकडून अधिक चांगल्या प्रकारच्या हमीची अपेक्षा करीत असते. भारत-सरकार मात्र अमेरिकेला दिलेल्या हमीपेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेची हमी द्यावयास तयार नाहीं.



### वर्गणी न देणारीं राष्ट्रें

संयुक्तराष्ट्र संघटनेचे सध्यां १११ सभासद आहेत. त्यांपैकी ५१ सभासद-देशांनीं कांगोमध्यें शांततेसाठीं करण्यांत येत असलेल्या कारवाईसाठी लागणाऱ्या खर्चातील आपली वर्गणी अद्याप दिलेली नाहीं. ह्यापैकी रशियाकडून यावयाची रक्कम सर्वांत मोठी म्हणजे सुमारें ३ कोटी डॉलर्सपेक्षाहि थोडी अधिक आहे. त्याशिवाय फ्रान्स, राष्ट्रीय चीन, बेल्जम, झेकोस्लोव्हाकिआ, ह्या राष्ट्रांकडूनहि मोठ्या रकमा यावयाच्या आहेत. आफ्रिकेंतील बऱ्याच छोट्या राष्ट्रांकडूनहि वर्गणी आलेली नाहीं.

### देवीच्या रोगानें होणारे मृत्यु

जगांत देवीच्या रोगानें जितके मृत्यु घडून येतात त्यांपैकी ६० टक्के मृत्यु भारतांत व पाकिस्तानांत मिळून होतात, असें आढळून आलें आहे. १९५८ सालीं ह्या रोगानें मृत्यु पावलेल्यांची संख्या २,४५,९७८ होती. त्यांपैकी २,२०,७१३ मृत्यु भारतामधील होते. १९६१ सालीं ७३,३४९ मृत्यूंपैकीं ४७,९३८ मृत्यु भारतांत व पाकिस्तानांत झालेले होते.

### शास्त्रीय विषयांचे पदवीधर बहुशः सरकारी नोकरींत

शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळानें केलेल्या पाहणीप्रमाणें शेती व शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांपैकी बहुतेक पदवीधर सरकारी नोकरी करीत आहेत. ६,००० शेती-पदवीधरांची आणि ६०,००० शास्त्रीय पदवीधरांची माहिती जमवून हा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. शेतीच्या पदवीधरांपैकी ८६ टक्के पदवीधर समाजविकास योजना अगर इतर सरकारी शेती योजनांत काम करीत आहेत. १० टक्के शेतीपदवीधर खासगी संस्थांतून काम करीत आहेत, अगर स्वतःच्या शेतीवर राबत आहेत. शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांपैकी ५० टक्के पदवीधर सार्वजनिक मालकीच्या संघटनांतून कामावर आहेत. शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांत बेकारीचें प्रमाण १३ टक्के आहे व शेतीच्या पदवीधरांत तें ४ टक्के आहे. नौकरी करत असलेल्या शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांचें वेतन दरमहा १०० ते ३०० रुपयांच्या गटांत आहे.

### भारत आणि पूर्व जर्मनी ह्यांमधील व्यापार

भारत व पूर्व जर्मनी ह्यांच्या दरम्यान लवकरच एक व्यापारी करार करण्यांत येणार आहे. सध्यां उभयता देशांत दरसाल १६ कोटी रुपयांची व्यापारी देवघेव होते. १९६६ सालापर्यंत ती दुप्पट करण्यांत येईल. उभयता देशांच्या दरम्यान सध्या चालू असलेल्या कराराची मुदत चालू वर्षाअखेर संपत आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७११००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

*भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!*

सारस्वत

को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ९·८३ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ११·३३ ,, |
| ठेवी | रु. ३५९·९२ ,, |
| खेळतें भांडवल | रु. ३९४·५२ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व




बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८

ALCO

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

### बोकॅरो पोलाद कारखाना कोण बांधणार ?

भारतांत बोकॅरो येथें बांधण्यांत यावयाच्या चौथ्या पोलादाच्या कारखान्यासाठी अमेरिकेकडून मिळावयाची मदत अद्याप निश्चित झालेली नाहीं. भारत सरकारनें हा कारखाना बांधण्याचा मात्र चंग बांधलेला आहे. ह्या बाबतींत कांहीं नव्या घडामोडी झाल्या आहेत. अमेरिकेनें हा कारखाना बांधण्याचें नाकारलें तर ब्रिटन व पश्चिम जर्मनी संयुक्तरीत्या कारखाना बांधण्यास तयार असल्याची वार्ता आहे. ह्या कारखान्यासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची तरतूद तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला जरूर असणाऱ्या २,५०० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाच्या खर्चीत करण्यांत आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनापैकी सुमारें ४७५ कोटी रुपयांचें परदेशीय चलन भारत स्नेहमंडळांतील देशांतर्फे भारताला दरसाल मिळत आहे. बोकॅरो येथील संकल्पित कारखान्यासाठी आतां भारत स्नेहमंडळातर्फे येणाऱ्या मदतीचा उपयोग करण्यांत येईल. इतर देशांकडून ह्याच कारखान्यासाठी मदत आली, तर तिचाहि वापर करण्यांत येईल.

### ऐतिहासिक वस्तूंचें रक्षण

म्हैसूर राज्यांत श्रीरंगपट्टम् येथें 'दर्यादौलत' ह्या नांवाची ऐतिहासिक महत्त्वाची इमारत आहे. ह्या इमारतींत इतिहासप्रसिद्ध टिपू सुलतानच्या राजवटींतील अनेक वस्तूंचें जतन करण्यांत आलें आहे. 'दर्यादौलत' ही टिपू सुलताननें ऐषआरामांत राहण्यासाठी बांधलेली प्रेक्षणीय इमारत असून तिच्या भोंवतीं ४७ एकर जागेंत बाग आहे. इमारतीला कावेरी नदीचा विळखा पडलेला आहे. आतां या इमारतींत असलेला वस्तुसंग्रह जतन करून ठेवण्यासाठी भारत सरकारच्या पुरातन खात्यानें नवीन इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. मूळच्या इमारतीभोंवतालची बाग टिपूच्या राजवटींत जशी होती तशीच पुन्हां करण्यांत येणार आहे. श्रीरंगपट्टम्चा किल्ला आणि त्यामधील प्रेक्षणीय स्थळें पाहाण्यासाठी प्रवाशांची नेहमीं गर्दी असते.

### अण्वस्त्रांचा हल्ला झाल्यास मदत

चीन आणि रशिया ह्यांच्यामधील वाद विकोपाला गेल्यानंतर चीननें स्वतःच्या बळावर विसंबून अणुबॉंब तयार करण्याचें ठरविलें. त्यानंतर अणुबॉंब बनविणें चीनला आर्थिक दृष्ट्या परवडणार नाहीं असा इशारा रशियाचे पंतप्रधान श्री. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं जाहीर रीत्या दिला होता. चीन व रशिआ ह्यांच्यांत आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा परस्पर-सहाय्यक लष्करी करार असल्यानें चीनला अणुबॉंब तयार करण्याची गरजच नाहीं असें रशिआचें म्हणणें आहे. रशिआ व चीन ह्यांचे मतभेद कितीहि बिघडलेले असले तरी चीनवर अण्वस्त्रांचा हल्ला झाल्यास रशिआ चीनच्या मदतीस धावून जाईल, अशी सूचना मॉस्को रेडिओवरून देण्यांत आली आहे.

### कांडला-गुजरात रेल्वेमार्ग

कांडला बंदर सल्लागार समितीची बैठक भरून तींत कांडला मुक्त बंदर विभाग गुजरातला जोडणारा रुंद रुळाचा रेल्वेमार्ग लवकरच बांधण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यांत आली. ह्या कामासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १२ कोटि, ८९ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. हा रेल्वेमार्ग झाल्यावर गुजरात राज्याच्या औद्योगिक वाढीस जोराची चालना मिळणार आहे.


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,
३८१ क, शनिवार पुणें २.



दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षे—४½ टक्के, ३ वर्षे—४¾ टक्के,
४ वर्षे—५ टक्के, ५ वर्षे—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा-विस्तार

शाखा—१. मुंबई—फोर्ट, २. मुंबई—गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१-१२-१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.
रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.